महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sr J. J. School of Art compound, Dr. D. N. Road, Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक कशिमं/२०२६/पाच/ ९७२ दिनांक :- 19 JUN 2026

वाचावे : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्रमांक एडीआर-२०२५/CN-११८२७३२/प्र.क्र.७४/तांशि-६, दिनांक १४ जुलै, २०२५.

# परिपत्रक

संदर्भीय शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत गतवर्षीप्रमाणेच बालचित्रकला स्पर्धा २०२६ चे आयोजन दिनांक ०८ ऑगस्ट, २०२६ रोजी करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषद/नगरपालिका/ महानगरपालिका यांच्या हद्दीतील सर्व शासनमान्य प्राथमिक व माध्यमिक शाळामध्ये इयत्ता १ ली ते १० वी मधील इयत्तानिहाय ४ गटामध्ये एकाच दिवशी बालचित्रकला स्पर्धा आयोजित करावयाची आहे. महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी https://www.msbae.ac.in या संकेतस्थळावरील बालचित्रकला या टॅबमध्ये किंवा या https://balchitrakala2026.msbae.in लिंकवर शाळेची ऑनलाईन नोंदणी करावयाची आहे. गटनिहाय तपशील व प्रवेश शुल्क खालील प्रमाणे.

| अ.क्र. | इयत्ता | गट | स्पर्धा प्रवेश शुल्क |
|---|---|---|---|
| १. | पहिली व दुसरी | पहिला | प्रति विद्यार्थी रु.२०/- या रक्कमेमधून ड्रॉईंग कागदाचा (११ इंच X १५ इंच या आकाराचा) खर्च रु.५/- वजा करुन उर्वरीत रक्कम **रु.१५/- प्रति विद्यार्थी मंडळाकडे ऑनलाईन जमा करावी.** |
| २. | तिसरी व चौथी | दुसरा | |
| ३. | पाचवी, सहावी व सातवी | तिसरा | |
| ४. | आठवी, नववी व दहावी | चौथा | |

शाळेची नोंदणी व विद्यार्थी नोंदणी कालावधी तपशील.

| अ.क्र. | तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | बालचित्रकला स्पर्धेकरिता संबंधित केंद्र/ शाळा ऑनलाईन नोंदणी | दि.०१.०७.२०२६ | दि. ३१.०७.२०२६ |
| २ | बालचित्रकला स्पर्धेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे. (संबंधित केंद्र/ शाळा मार्फत) | दि.०१.०७.२०२६ | दि. ३१.०७.२०२६ |
| ३ | परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्वीकारणे | दि.०२.०७.२०२६ | दि. ३१.०७.२०२६ |

मुख्याध्यापक/ प्राचार्य, सर्व जिल्हा परिषद/नगरपालिका/ महानगरपालिका यांच्या हद्दीतील सर्व शासनमान्य प्राथमिक व माध्यमिक शाळा यांना कळविण्यात येते की, बालचित्रकला स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी गटनिहाय व सर्वसाधारण नोंदवहीतील (General Register) नावाप्रमाणे अचूक ऑनलाईन नोंदणी

शाळेमार्फत करावी. बालचित्रकला स्पर्धेकरिता शाळेची नोंदणी व विद्यार्थ्यांची नोंदणी https://www.msbae.ac.in या संकेतस्थळावरील बालचित्रकला या टॅबमध्ये किंवा https://balchitrakala2026.msbae.in या लिंकवर भरावयचा आहे. सदर स्पर्धेकरिता जास्तीत जास्त विद्यार्थी नोंद होण्याकरिता सर्व संबंधित विद्यार्थी तसेच पालक व शाळा यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय निदर्शनास आणावा.

(विनोद रं. दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रति,

१) केंद्र प्रमुख (सर्व), शासकीय रेखाकला परीक्षा २०२६.
२) मुख्याध्यापक/ प्राचार्य (सर्व) ,जिल्हा परिषद/नगरपालिका/महानगरपालिका/अनुदानित/ विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळा.

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
४) उप सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई /नागपूर/छत्रपती संभाजीनगर.
५) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
६) आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे.
७) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/(प्राथमिक), जिल्हापरिषद (सर्व)
१०) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)
११) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
१२) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग, मुंबई.
१३) निवड नस्ती